पोलीस आयुक्तालय ,अमरावती
दिनांक १६.११.२०२१

## — प्रेस नोट —

दिनांक १३.११.२०२१ रोजी अमरावती शहरामधे अचानक जमावाने हिंसक वळण घेउन व शहरामध्ये तोडफोड सुरु केली होती.त्यामध्ये सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होवुन जिवीत हानी होण्याची सकृत दर्शनी परिस्थिती निर्माण झालेली होती.

अमरावती शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरीता, प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता कलम—१४४ जाफौ.प्रमाणे संपुर्ण संचारबंदीचे ( कर्फ्यु ) आदेश निर्गमित करण्यात आलेले होते.अमरावती शहरामधिल नागरीकांच्या अडीअडचणी लक्षात घेवुन काही वेळाकरीता संचारबंदीमध्ये शिथिलता देणे आवश्यक असल्याने दिनांक **१७.११.२०२१ रोजीचे दुपारी १२.०० ते १६.००** या कालावधीत जिवनाश्यक वस्तुचे आवागमन, दुध वाटपाकरीता, तसेच जे विद्यार्थी शासकिय अथवा निमशासकिय परिक्षा देण्यास पात्र आहेत अथवा त्यांचेकडे परिक्षेचे ओळखपत्र उपलब्ध आहे अशा विद्यार्थाना त्यांचे परिक्षेचे वेळेनुसार सुट देण्यात येत असल्याचे मा. डॉ.आरती सिंह पोलीस आयुक्त अमरावती यांनी आदेश पारित केलेले आहे.**इतर दिवशी सदरचा आदेश पुर्वीप्रमाणे कायम राहील**

अमरावती शहरातील सर्व नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन मा. डॉ.आरती सिंह पोलीस आयुक्त अमरावती यांनी केलेले आहे.

कार्यालय पोलीस आयुक्त अमरावती

पोलीस निरीक्षक
विशेष शाखा, अमरावती